महाराष्ट्र राज्य वखार महामंडळातील कर्मचाऱ्यांना “महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना” लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : वखार १४१४/प्र.क्र. ९०/९-स,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:-३१ मे, २०१८

वाचा :- महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे, यांचे पत्र क्र. मरावम/आस्थापना/निवृत्तीवेतन योजना/अ-१/२७६, दिनांक ५ फेब्रुवारी २०१५

प्रस्तावना :-

केंद्रीय वखार अधिनियम १९६२ अन्वये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची राज्यात शेतमाल व अनुसूचीत वस्तूंची शास्त्रशुद्ध पद्धतीने साठवणूक करणेसाठी केंद्रीय वखार महामंडळ व महाराष्ट्र शासन यांच्या समान (५०% - ५०%) भाग भांडवलाच्या सहयोगातून स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ हे सतत आतापर्यंत नफ्यात असून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाकडून राज्य शासनास व केंद्रीय वखार महामंडळास दरवर्षी नफ्यावर लाभांश देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ कर्मचाऱ्यांच्या वेतन, भत्ते व इतर दैनंदिन खर्च महामंडळ स्वत: च्या उत्पन्नामधून भागवित असुन त्यासाठी राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडत नाही. केंद्रीय वखार महामंडळ यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी दि. ०१ जानेवारी, २००७ पासून अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळातील कर्मचाऱ्यांना केंद्रीय वखार महामंडळाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने संशोधित केलेली परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने वाचा येथिल पत्रान्वये प्रस्ताव सादर केला होता. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ स्थापनेपासुन सातत्याने नफ्यात असलेले महामंडळ असल्यामुळे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळातील कर्मचाऱ्यांना अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत मान्यता देणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा प्रस्ताव विचारात घेऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या संचालक मंडळ यांचे वाचा येथिल प्रस्ताव विचारात घेऊन “महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना” खालील प्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) या योजनेस **“महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना - २०१८”** असे संबोधण्यात येईल. तसेच ही योजना शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होईल.

२) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निवृत्तिवेतन निधीचे व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ -Indian Trust Act, १९८२० अन्वये **“महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ अंशदायी निवृत्तीवेतन ट्रस्ट” (Maharashtra State**

Warehousing Corporation Contributory Pension Trust) स्थापना करेल. सदर ट्रस्ट -Income Tax Act, १९६१॰ अन्वये नोंदणीकृत करून **महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना - २०१८ योजनेची** अंमलबजावणी व नियमन हे महामंडळाच्या संचालक मंडळाने सदर शासन निर्णयाच्या अटी/शर्ती नुसार करावे.

३) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्रत्येक कर्मचाऱ्यास त्याच्या "मूळ वेतन अधिक महागाई भत्ता" या रकमेच्या ५ टक्के इतके अंशदान द्यावे लागेल. ही रक्कम प्रत्येक महिन्याच्या कर्मचाऱ्याच्या वेतन देयकातून वजा करून घेतली जाईल. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ समतुल्य म्हणजेच "मूळ वेतन अधिक महागाई भत्ता" या रकमेच्या ५ टक्के अंशदान देईल.

४) सदर योजना दिनांक ०१ जुलै, २००७ रोजी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीता ऐच्छिक व त्यानंतर सेवेत रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांना अनिवार्य (Compulsory) करण्यात येत आहे. त्यामुळे ऐच्छिक कर्मचाऱ्यांना त्यांच्या मासिक अंशदानाचा थकीत हप्ता जमा केल्यानंतरच त्याप्रमाणात महामंडळाच्या हिश्याची रक्कम जमा करण्यात यावी. दिनांक ०१ जुलै, २००७ नंतर सेवेत रुजु झालेल्या कर्मचाऱ्यांच्या हिश्याची या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंतचे अंशदान भरण्याचे टप्पे व पध्दत वरिल क्रमांक २ प्रमाणे गठित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ अंशदायी निवृत्तीवेतन ट्रस्ट ने निश्चित करावी.

५) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ भविष्यात तोट्यात गेल्यास महामंडळाचे मासिक अंशदान जमा करण्यात येणार नाही. महामंडळ नफ्यात आल्यानंतरच मासिक अंशदान जमा करण्यात येईल.

६) ही योजना लागू करण्यामुळे येणारा खर्च महामंडळाने स्वतःच्या उत्पन्नामधुन भागवावा. त्याकरीता राज्य शासनाकडून भविष्यात कोणतेही अर्थसहाय्य/अनुदान देय राहणार नाही.

७) केंद्रीय वखार महामंडळाला लागू करण्यात आलेली परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना भविष्यात बंद झाली अथवा संशोधित झाली तर महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची सदर योजना बंद अथवा सुरू ठेवण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव महामंडळाने विभागामार्फत वित्त विभागाच्या पूर्व मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाचा अनौ. संदर्भ क्रमांक ९८/सा.ऊ. दि. १६.५.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत असुन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५३११८२१०२०३०२ असा आहे. हा आदेश डिजीटली स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahendra Shantaram Pujari

Digitally signed by Mahendra Shantaram Pujari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMTD DEPARTMENT, postalCode=400012, st=Maharashtra, 2.5.4.20=16153bd1d85632a421d5a5fd23bf5e5bb624d27f2c8cf59fb17e3ead3a034dbc, cn=Mahendra Shantaram Pujari
Date: 2018.06.01 11:47:10 +05'30'

(महेंद्र पुजारी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा राज्यपाल .महोदय यांचे प्रधान सचिव
२.मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव सचिव
३. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव

४. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ पुणे
६. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (सा.ऊ.), मंत्रालय, मुंबई
८. सर्व कक्ष अधिकारी, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई
९. निवडनस्ती (९-स)